# Gramin Krishi Mausam Sewa

Experimental Block Level Agromet Advisory Bulletin
(A Joint Initiative of IMD & ICAR )

## Agromet Advisory Bulletin

**Date : 11-05-2021**

**Weather Forecast of BHIVAPUR Block in NAGPUR(Maharashtra) Issued On :2021-05-11(Valid Till 08:30 IST of the next 5 days)**

| Date (y-m-d) | Rainfall (mm) | Tmax (°C) | Tmin (°C) | RH I (%) | RH II (%) | Wind Speed (kmph) | Wind Direction (Degree) | cloud cover (Octa) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2021-05-12 | 0.0 | 39.1 | 24.5 | 60 | 32 | 10.0 | 180 | 2 |
| 2021-05-13 | 0.0 | 39.8 | 27.0 | 38 | 14 | 7.0 | 289 | 4 |
| 2021-05-14 | 0.0 | 38.5 | 24.6 | 50 | 16 | 10.0 | 297 | 5 |
| 2021-05-15 | 0.0 | 38.7 | 23.5 | 58 | 26 | 13.0 | 189 | 6 |
| 2021-05-16 | 0.0 | 39.5 | 25.5 | 54 | 21 | 12.0 | 158 | 8 |

### Weather Summary/Alert:

In Bhivapur block, as per forecast given by, IMD, RMC, Nagpur, skywill bepartly cloudyto partially cloudy during next five days (12th May, 2021 to 16th,May, 2021) as well as light to moderate rainfall and thunderstorm accompanied with lightning and gusty winds (speed reaching 30-40 kmph) on 12th May, light to moderate rainfall and thunderstorm accompanied with lightning on 13th May as well as light to moderate rainfall on 14th, 15th and 16th May, 2021 is forecasted.

भिवापुर तालुक्यामध्ये,भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार,दिनांक १२ मे २०२१ ते १६ मे २०२१ दरम्यान आकाश आंशिक ढगाळ ते अंशतः ढगाळ तसेच दिनांक १२ मे २०२१ रोजी वादळी वारा (वाऱ्याचा वेग: ३० ते ४० किमी प्रती तास ) आणि मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि हलका ते मध्यम पाऊस, दिनांक १३ मे २०२१ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि हलका ते मध्यम पाऊस, दिनांक १४, १५ आणि १६ मे २०२१ रोजी हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### General Advisory:

Harvest the matured paddy and others crop and stored at safe placeandcover with tarpaulin.Fruit orchards, vegetable and other vine family crops should be supported with bamboos depending on the stage of crop growth. Animals should be kept away from open water sources, rivers or lakes and tractors and other metal implements.

परिपक्व झालेल्या उन्हाळी धान पिकाची व इतर पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावीव ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावे. फळबाग,भाजीपाला आणि वेलवर्गीय पिकाला पिक वाढीची अवस्था बघून बांबू किंवा काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव,ट्रॅक्टरव इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे.

### SMS Advisory:

Farmers are advice to avoid pre monsoon sowing.

शेतकरी बांधवांनी कपाशीची पूर्व हंगामी लागवड टाळावी.

### Crop Specific Advisory:

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| RICE | Harvesting of mature paddy and other crops should be done keeping in view the local weather conditions during clear and dry dayconsidering the forecast of rainfall, gusty wind and lightning.<br>पाऊस, वादळी वारा आणि विजांचा कडकडाचा अंदाज लक्षात घेता परिपक्व झालेल्या धान आणि इतर पिकाची काढणी ची कामे स्थानिक हवामान परिस्थिती बघून कोरडा व उघडीचा दिवस बघून करावी. |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| SOYABEAN | In view of the scarcity of soybean seeds for the coming kharif season, farmers should use household grain as seeds instead of selling them in the market. If household grains are to be used as seeds, the germination capacity of the seeds should be checked.<br>शेतकरी बांधवांनी येणाऱ्या खरिप हंगामासाठी सोयाबीन बियाण्याची टंचाई बघता आपल्या जवळील बियाण्याची बाजारात धान्य म्हणून विक्री न करता ते बियाणे म्हणून वापरा. घरचे धान्य बियाणे म्हणून वापरावयाचे असल्यास बियाण्याची उगवण क्षमता तपासून घ्यावी. |
| COTTON | Farmers are advice to avoid pre monsoon sowing.<br>शेतकरी बांधवांनी कपाशीची पूर्व हंगामी लागवड टाळावी. |
| TOMATO | In the view of present cloudy and rainy weather, if tomato leaf blight was noticed, spraying should be taken of Mancozeb 75 WP 25 gms or Copper oxychloride 50 WP 25 gms mix with in 10 liters of water. For control of thrips and white fly on tomato crop, spraying should be taken of Thimethoxam 25% WG 4 gm or Dimethoate 30% EC in 10 ml per 10 liters of water. For management of tomato fruit borer spraying should be taken quinalphos 25 EC 20 ml in 10 litre of water.<br>सद्य स्थितीत ढगाळ आणि पावसाच्या हवामानामुळे टोमॅटो पिकामध्ये करपा रोगाचा प्रादुर्भावदिसून असल्यास नियंत्रणासाठी मॅनकोझेब ७५ डब्लूपी. २५ ग्राम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी. २५ ग्राम, १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलकिडे आणि पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्राव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| GROUNDNUT | In groundnut, for control of leaf folder or leaf miner, when ETL cross (2 larva per plant or 10 percent leaves are damage), then apply spraying of Quinalphos 25 % EC, 1 litre/hectare mix with 500 litre of water (20 ml/10 litre of water) or Deltamethrin 2.8 % EC, 500 ml per hectare in 400-600 litre of water (10ml/ 10 litre of water). For control thrips, when ETL cross (5 thrips per three leaves), then spraying should be taken of Quinaphos 25 % EC (28 ml/10 liter of water) 1400 ml/hectare in 500 litres of water.<br>भुईमुग पिकामध्ये पाने पोखरणारी अथवा गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव दोन अळ्या प्रती झाड किंवा झाडाच्या मध्यवर्ती भागात १० टक्के पाने पोखरलेली अशी आर्थिक नुकसानीची पातळी आढळल्यास क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही १ लिटर प्रती हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून (२० मी.ली./ १० लिटर पाणी) किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही ५०० मी.ली. प्रती हेक्टरी ४००-६०० लिटर पाण्यात मिसळून (१० मी.ली./ १० लिटर पाणी) फवारणी करावी. फूलकिड्यांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसानीची संकेत पातळी ५ फुलकिडे प्रति शेंडा गाठल्यावर क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही १४०० मिली प्रति हेक्टरी ५०० लिटर (२८ मी.ली./१० लिटर पाणी) पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**Horticulture Specific Advisory:**

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| BRINJAL | In the view of present cloudy and rainy weather, if the incidence of aphids, thrips, whitefly and spider mites on brinjal crop, spraying should be taken 2 weeks after planting with Dimethoate 30% EC 10 ml or Quinalphos 25% EC 20 ml or thiometon 25% EC 10 ml per 10 liters of water. For management of top shoot and fruit borer spraying should be taken of cypermethrin 25 % EC 30 ml in 10 litre of water.<br>सद्य स्थितीत ढगाळ आणि पावसाच्या हवामानामुळे वांगी पिकावर मावा, तुडतुडे, पांढरी माशी व कोळी किडीच्या प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी रोप लावणीनंतर २ आठवड्यांनी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली किंवा क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली किंवा थायोमेटोन २५ टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.शेंडे आणि फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ORANGE | If the branches of orange orchards are broken due to hail in the district, the branches should be cut off with the help of secateur and then immediately spray with carbendazim 100 gm and 1 kg urea per 100 liters of water.<br>जिल्ह्यात गारपिटीमुळे संत्रा फळबागेतील झाडाच्या फांद्या मोडलेल्या असल्यास सिकेटर च्या सहाय्याने कापून टाकाव्यात व त्यानंतर त्वरित कार्बेन्डाझीम १०० ग्राम आणि १ किलो युरिया प्रती १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| ORANGE | Apply Bordeaux paste on the tree trunk up to height of 60 cm by paint brushto orange and sweet orange. For preparation of Bordeaux paste dissolve 1 kg copper sulphate in 5 litres of water in a plastic bucket and 1 kg slaked lime in 5 litres of water in separate bucket and leave it overnight. Next day mix them together in another bucket to make a paste. Apply the paste on tree trunk within 12 hours after mixing. |
| | संत्रा व मोसंबीच्या झाडाच्या बुंध्यावर ६० सेमी पर्यंत ब्रश च्या सहाय्याने बोर्डो पेस्ट लावावी. बोर्डोपेस्ट तयार करण्यासाठी १ किलो मोरचूद ५ लिटर पाण्यात आणि १ किलो चुना ५ लिटर पाण्यात रात्रभर भिजत घालून दुसऱ्या दिवशी सकाळी एकत्र करून १२ तासाच्या आतमध्ये पेस्ट वापरावी. |
| SWEET ORANGE | If the branches of sweetorange orchards are broken due to hail in the district, the branches should be cut off with the help of secateur and then immediately spray with carbendazim 100 gm and 1 kg urea per 100 liters of water. |
| | जिल्ह्यात गारपिटीमुळे मोसंबी फळबागेतील झाडाच्या फांद्या मोडलेल्या असल्यास सिकेटर च्या सहाय्याने कापून टाकाव्यात व त्यानंतर त्वरित कार्बेन्डाझीम १०० ग्राम आणि १ किलो युरिया प्रती १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| CHILLI | For control of sap sucking pest on Chilli crops, spray 5 % Neem ark or imidaclopride 17.8 SL 5 ml per 10 lit. of water. |
| | मिरची पिकावरील रसशोषक किडीच्या नियंत्रणाकरिता,५ टक्के निंबोळी अर्क किंवा ईमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| SWEET ORANGE | If citrus trees are showing oozing symptoms of gum, then scrap the area with a sharp knife and apply mefenoxam MZ-68 or fosetyl Al paste on it. |
| | जर लिंबूवर्गीय झाडे (संत्रा, मोसंबी, लिंबू)डिंक्याचा स्त्राव दिसत असल्यास तीक्ष्ण चाकूने तो भाग खरडा आणि त्यावर मेफेनोक्सम एमझेड - ६८ किंवा फॉसेटल एएल पेस्ट लावा. |
| MANGO | For control of fruit drop in mango spraying should be taken of 20 parts per million (PPM) Naphthalic Acetic Acid (NAA) mix with in water and apply on the inflorescence. |
| | आंबा पिकावरील फळगळ कमी करण्यासाठी २० पीपीएम नॅफथालिक एसिटिक एसिड (एनएए) १० लिटर पाण्यात मिसळून मोहोरावर फवारणी करावी. |
| ORANGE | In Nagpur mandarin and sweet orange one year old tree should be given 17 litres of water /day/ tree, 5 year old tree need 102 litres / day / tree, 8 years tree require 188 litres / day/ tree and 10 years and above tree require 235 litres water / day/ tree. Give water stress to tree for preparing them for the Mrig bahar in June. If citrus trees are showing oozing symptoms of gum, then scrap the area with a sharp knife and apply mefenoxam MZ-68 or fosetyl Al paste on it. |
| | ठिबक संच असल्यास संत्रा व मोसंबीच्या १ ते ४, ५ ते ७ आणि ८ वर्षावरील झाडांना अनुक्रमे, १७ ते ७४, १०२ ते १६६ व १८७ ते २३५ लिटर पाणी प्रती दिवस द्यावे. जून मध्ये मृग बहार घेण्याकरिता संत्रा बगीच्यांना जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाण्याचा ताण द्यावा. संत्रा झाडाच्या बुंध्यातून डिंक्याचा स्त्राव सुरु असेल तर असा भाग तिक्ष्ण चाकूने खरडून, त्याठिकाणी मेफेनोक्झाम एमझेड-६८ किंवा फोसेटील आम्लाची पेस्ट लावावी. |

**Live Stock Specific Advisory:**

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|
| GOAT | Vaccinate thegoat against FMD, HS, PPR and enterotoxaemia.Offer clean and cold water (stored in earthen pot) to the animals. Keep the livestock under the shed to protect from heatand lightning. |
| | शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. जनावरांचे उष्णतेपासून व विजांपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. |
| BUFFALO | Avoid lettingcow, buffalo, goats, sheep, and other animals graze in open spaces as there is a possibility of rain and lightning. Make arrangements to provide feed and water to the cattle at shed. |

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|
| | पाऊसव विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्यानेगाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या, व इतर जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरांना गोठ्यातच चारा आणि पाण्याची व्यवस्था करावी. |

**Others (Soil / Land Preparation) Specific Advisory:**

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| GENERAL ADVICE | Farmersand farmlabor are to follow precautions and safety measures to be taken to prevent theCOVID-19 disease spread. Simple measures include social distancing, maintaining personal hygiene by washing of hands with soap, wearing of face mask, protective clothing and cleaning of implements and machinery. Workers to follow safety measures and social distancing at each and every step in the entire process of field operations.Precautions and safety measures of workers engaged in repair, maintenance and harvesting operation is to be ensured.In case of manual field operations of harvesting/ picking, accomplish the operation in 4-5 feet spaced strips assigning one strip to one person. This will ens |
| | सर्व शेतकरी बंधू आणि शेतमजुरांनी कोविड- १९ रोगाचा प्रसार रोखण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या सर्व खबरदारी आणि सुरक्षा उपायांचे पालन केले पाहिजे. साध्या उपायांमध्ये सामाजिक अंतर ठेवणे, साबणाने हात धुवून वैयक्तिक स्वच्छता राखणे, चेहऱ्यावर मुखवटा घालणे, संरक्षक कपडे आणि इतर शेतीपयोगी उपकरणे व यंत्रसामग्री स्वच्छ करणे आवश्यक आहे. शेती कामातील सर्व प्रक्रीयेमेध्ये सुरक्षित उपाययोजना आणि शेती कामगारांनी सामाजिक अंतर बाळगणे आवश्यक आहे. कापणी/वेचनीचे कामे असल्यास, एका व्यक्तीला ४ ते ५ फुटाची काठी वाटप करून ठराविक त्या पट्टीच्या अंतरामध्येच कामे पूर्ण करावी, जेणेकरून व्यस्त कामगारांच्या दरम्यान पुरेसे अंतर सुनिश्चित करेल. |
| LAND PREPARATION | Cultivation of land (Ploughing, harrowing) should be done parallel to counter line or horizontally along the main slope. Therefore, rain water seeps into the soil and helps to reduce soil erosion. |
| | जमिनीची मशागत (नांगरणी, वखरणी) समतल किंवा मुख्य उताराला आडवी करावी. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरून जमिनीची धूप कमी होण्यास मदत होते. |
| GENERAL ADVICE | Groundnut, sesame, green gram, and sugarcane should be irrigated at intervals of 6 to 7 days depending on the available soil moisture and crop need. |
| | शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींची फवारणी करताना स्वतःची योग्य ती काळजी/खबरदारी घ्यावी. |
| SOIL TESTING | Soil samples for soil testing should be taken and sent to the nearest Agriculture university, Krishi Vigyan Kendra or other government soil testing laboratory with appropriate soil testing charges. |
| | माती परीक्षणासाठी मातीचे नमुने काढून ते जवळच्या विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र किंवा इतर शासकीय मृदा परीक्षण प्रयोगशाळेत योग्य शुल्कासह पाठवून माती परीक्षणाच्या अहवालानुसार पिकानुसार रासायनिक खताचे किंवा इतर कृषी निविष्ठांचे नियोजन करावे. |
| GENERAL ADVICE | Farmers should take care of thunder and lightning in the sky: If you are working in the field, take shelter immediately near the field. After taking shelter in a safe place in the field, keep dry wood, plastic, gonapath, dry mulch under the feet. Sit with both feet together and both hands on your knees. Make sure that no part of your body touches the ground except your feet. Individuals working in ponds, such as places where there is moisture in the soil or water sources, should go to a safe and dry place immediately. If there are tall trees nearby, take shelter at a distance twice the height of that tree. |
| | शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्हीशेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षितठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडापालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवूनतळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीलास्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणीकिंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे.जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या |

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| | उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावरआश्रय घ्यावा. |
| GENERAL ADVICE | Farmers should take care of thunder and lightning in the sky: A pucca house is the safest place to avoid lightning. Farmers should plant trees as low as possible around their houses and livestock sheds. Moist, swampy places and water sources (wells, lakes, rivers, farm ponds etc.) should be avoided as much as possible. If traveling in a four-wheeler, stop in the vehicle. Farmers should take care that they do not have any metal tools. When working in the field, do not let more people work together at the same time. Care should be taken to keep a distance of at least 15-20 feet between two persons. Do not use an umbrella with a metal rod. Stay away from other electric tools made by farmers as |
| | शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: विजांच्याबचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेचजनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासूनशक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे.शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी.शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोनव्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडीअसलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासूनबनलेल्या इतर कृषी अवजारांपासून द |